"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : ०२२ – ४७४९ ८२५९ / ९८६७६ ७४८६४
**WEB SITE** : **http://www.nkgsbsangh.org**
**E-MAIL** : **nkgsbs@gmail.com**
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

॥ इदं च नास्ति परं च न लभ्यते ॥

परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ

मूल्य रु. ५

क्रमांक ३ | वर्ष : ४७ | ऑक्टोबर–डिसेंबर २०२५

**BOOK PACKET**
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

**दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ आणि दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी**

## *वार्षिक स्नेह संमेलन २०२५*

## निमंत्रण पत्रिका

ज्ञातीतील सर्व बंधुभगिनींना नम्र विनंती आहे की आपण सर्वांनी ज्ञातीच्या येत्या वार्षिक स्नेहसंमेलनास उपस्थित राहून शोभा आणावी व कार्यक्रम यशस्वी करण्यास साहाय्य करावे.

**: प्रमुख पाहुणे :**

डॉ. सतीश वामन वाघ

(Whole time Director and Executive Chairman of Supriya Life Science Ltd.)

( त्यांचा परिचय मुखपत्रिकेच्या संपादकीय मध्ये दिला आहे.)

स्थळ : **तेंडुलकर हॉल, मोगल लेन,**
माहीम, मुंबई–४०० ०१६

**दिनांक : रविवार ३० नोव्हेंबर २०२५, सायं. ४.१५ वाजता**

**कार्यक्रम**

✻ स्वागत गीत ✻ संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांची भाषणे
✻ प्रमुख पाहुण्यांचे मनोगत

**......मध्यंतर......**

✻ विवाहाची सुवर्ण जयंती ओलांडणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा सत्कार.
✻ एज्युकेशन सोसायटी तर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना श्रीमती स्मिता सतीश वाघ यांच्या हस्ते बक्षिसे.

स्नेह संमेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| **शिरीष दि. वाघ** | **देवदास अ. नाडकर्णी** |
| **कार्याध्यक्ष–संघ** | **कार्याध्यक्ष–एज्युकेशन सोसायटी** |

## यंदाच्या वार्षिक स्नेह संमेलनाचे प्रमुख पाहुणे यशस्वी उद्योजक डॉ. सतीश वामन वाघ यांचा परिचय –

आपल्याकडे 'धोपट मार्गा सोडू नको' या अर्थाची एक उक्ती आहे. कुठेतरी कायम स्वरूपी नोकरी मिळाली की झाली आयुष्याची इतिश्री. या अल्प संतुष्टी मानसिकतेला छेद देऊन बुद्धिमान, चतुर, दूरदर्शी, उद्यमशील, धाडसी, शिस्तबद्ध अशा सुसंस्कारांनी जडणघडण झालेली अष्टपैलू व्यक्ती म्हणजे ६९ वर्षाचे श्री. सतीश वामन वाघ. २९ डिसेंबर १९५५ हा त्यांचा जन्मदिवस. त्यांचे बालपण सरस्वतीबाग येथे त्यांच्या आजोळी डॉ. पुंडलीक देसाई यांच्या निवासस्थानी गेले. शालेय शिक्षण अरविंद गंडभीर हायस्कूल मध्ये. ते डबल पदवीधर आहेत. सुरुवातीला मामांच्या कारखान्यात थोडा अनुभव घेतल्यावर त्यांनी १९८७ साली 'सुप्रिया लाइफ सायन्स लिमीटेड' या नावाने रासायनिक उत्पादने बनवण्याचा उद्योग सुरू केला. औषधे निर्माण करणाऱ्या उद्योगांना काही रसायने लागतात त्याची ते निर्मिती करतात. त्यांचा मूळ कारखाना लोटे परशुराम येथे आहे.

शेवटी, नंबरच त्यांची प्रतिस्पर्ध्यांसमोर हकीकत प्रस्तुत करतात. सध्याची त्यांची उलाढाल ६०० कोटींच्या वर असून पुढील दोन–वर्षात १००० कोटी उलाढालीचे लक्ष त्यांनी केंद्रीत केले आहे. आज जवळजवळ १००० उच्च शिक्षितांना रोजगार देत त्यांनी दाखवून दिले आहे की उत्तम स्ट्रेटेजिक लिडरशीपमुळे उद्योगाला व्यावसायिक जगतात तसेच राष्ट्रीय इकॉनॉमी मध्ये उन्नती साधता येते. त्यांचा हा औद्योगिक हातभार संपूर्ण राष्ट्राला तसेच आंतरराष्ट्रीय जगाला अवगत झाला आहे. भारतीय तसेच परदेशी मोठमोठ्या उद्योजकांनी त्यांच्या ह्या कार्याचा गौरव केला आहे. त्याच बरोबर आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच अमेरिकेचे पूर्व राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनीही त्यांचा सत्कार केला आहे. डॉ. सतीश वाघ यांना वेळोवेळी त्यांच्या उत्कृष्ट संशोधन केंद्रासाठी व उत्तम दर्जासाठी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांच्या ह्या उद्योगात त्यांच्या दोघी मुली डॉ. सलोनी व डॉ. शिवानी यांचा सिंहाचा वाटा आहे. दोघी कंपनीच्या संचालक पदावर कार्यरत आहेत.

डॉ. सतीश वाघांनी आज पावेतो अनेक संस्थांना सढळ हस्ते मोठमोठ्या रकमेच्या देणग्या दिलेल्या आहेत व आजही देत आहेत. वर्षभरापूर्वी त्यांनी कोकीळाबेन हॉस्पीटलच्या नव्या पेडीयाट्रीक्स दालनासाठी १ कोटी रुपयांची देणगी दिलेली आहे. ते सतत गरीब विद्यार्थ्यांसाठी मदत करीत असतात.

शेवटी त्यांच हे वाक्य बरंच काही सांगून जाते :

"Success is not just about building a business, but about creating an ecosytem of innovation, ethical practices, and sustainable growth that elevates an entire industry and empowers a nation.

Every challenge is an opportunity to transform potential into performance."

यावेळी डॉ. सतीश वाघांनी आपले प्रमुख पाहुणे म्हणून येण्याचे निमंत्रण स्विकारले ही आपल्यासाठी पर्वणीच !

– प्रसाद कसबेकर





## प्रकाश झोत–१

### 'स्वरचंद्रिकेवरील पुस्तक म्हणजे गौरवग्रंथ'

**पद्मश्री पद्मजा फेणाणी यांच्यावर पं. हृदयनाथ यांची स्तुतिसुमने**

–'भारतरत्न लता मंगेशकर यांच्यानंतर कोणी चांगली गायिका असेल, तर ती म्हणजे पद्मजा फेणाणी–जोगळेकर.

– चित्रपटसृष्टीत न रमता भावगीत, शास्त्रीय संगीतात ठसा उमटवणाऱ्या त्यांच्याविषयीचे हे पुस्तक म्हणजे गौरव ग्रंथच आहे', अशा शब्दांत पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी स्तुतीसुमनांची उधळण केली.

– ज्येष्ठ गायिका पद्मश्री पद्मजा फेणाणी–जोगळेकर यांच्या सांगीतिक प्रवासाचा दस्तऐवज असलेल्या 'स्वरचंद्रिका' या पुस्तकाचे प्रकाशन शिवाजी पार्कच्या स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात जुलैमध्ये पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी भूषवले, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर उपस्थित होते. या पुस्तकाचे संपादन डॉ. संगीता गोडबोले यांनी केले आहे.

'देशात मोठे गायक, लेखिका, चित्रकार यांची नावे घ्यायची झाल्यास, रवींद्रनाथ टागोर, माझे गुरु सलील चौधरी यांच्या यादीत आता पद्मजा यांचा समावेश करावा लागतो. गायक म्हणून मोठी आहेच, पण उत्तम चित्रकारही आहे. 'तरुण आहे रात्र अजूनि' या गीतामुळे तिचे विशेष नाव झाले. या गाण्यातील चढ–उतार, वळणे अत्यंत कठीण आहेत. ते साधून अप्रतिम सादरीकरणाने गाणे तोलून धरणारी गायिका म्हणजे पद्मजा' असे सांगत हृदयनाथ मंगेशकर यांनी पद्मजा यांनी गायलेल्या अनेक गीतांना उजाळा दिला. पुस्तक प्रकाशनानंतर पद्मजा फेणाणी–जोगळेकर यांची सांगीतिक मुलाखत रंगली. यावेळी त्यांनी सादर केलेली गीते, कविता आणि बंदिशी यांमुळे रसिक मंत्रमुग्ध झाले.'पद्मजा यांनी संगीत सर्व स्तरांवर पोहोचवले' ''विज्ञान, वैद्यकीय क्षेत्रांत मैलाचा टप्पा पार केल्यानंतर, त्याचे फेसस्क्रिप्ट पुढे आणण्याची परंपरा आहे. 'स्वरचंद्रिका' हे पुस्तक पद्मजा यांचे फेसस्क्रिप्ट आहे. सिनेसंगीताची कास न धरता सर्व स्तरावर संगीत पोहोचवण्याचे काम पद्मजा यांनी केले आहे. जीवन परिपूर्ण करण्यासाठी विविध विषयांत प्रावीण्य मिळवणे, त्यांचा आस्वाद घेता येणे आवश्यक आहे. पद्मजा यांचे संगीत याचे उत्तम उदाहरण ठरते.'' या शब्दांत डॉ. अनिल काकोडकर यांनी पद्मजा फेणाणी–जोगळेकर यांचा गौरव केला.

## प्रकाश झोत–२



Kumar
Adit Shailendra Telang

Kumar Adit Shailendra Telang scored 97.40% marks in Dahisar Assembly Rustomji Cambridge International School with 97.40% marks. Dahisar's pride has raised due to this success.

This success achieved by Adit by combining knowledge, hard work and stubbornness is making his family proud.

Best wishes for his bright future! Encouragement of parents and hard work of students make great success.




**Mangsidesh Investment Pvt Ltd**

MSIPL We Make People Richer

**AMFI-Registered Mutual Fund Distributor**

402, Business Point, Paliram Road, Off S. V. Road, Behind Brahma Kumari Hosp., Andheri (West), Mumbai 400 058

Contact No. 022 4233 2300 to 2399, +91 91672 20380

## Invest in Your Future with Confidence

**Benefits to Invest in Mutual Fund:-**

1. Diversified portfolio to manage risk
2. Professional fund management expertise
3. Variety of asset classes (equity, debt, hybrid, index, ETFs)
4. Liquidity and flexibility
5. Potential for higher long-term returns




**Grow your wealth with our expertly managed Mutual Funds**

A little every month grows to something significant over time..

Invest Rs. 1,000/- Per month & get ..

| Investment Years | Total Investments | Growth rate 8% | Growth rate 12% | Growth Rate 15 % |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 275,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |

Indian Equity market has given average 16% returns in last 33 years

Mutual Fund Investments are subject to market risk, Read offer documents carefully before Investing.

Activat
Go to Set

## सदाशिवगडावैले प्रेम! –प्रसाद कसबेकर

हल्लीच मला एक फोन आला. समोरची व्यक्ती मला म्हणाली, ‘तुम्हाला एक माझ्या स्वतःच्या बाबतीतली गुप्त गोष्ट सांगायची आहे. परंतु त्यात माझं नांव कुठेच येता कामा नये. ही माझी तरूणपणातली प्रेम कथा आहे. सत्य घटना आहे. आज माझं वय ८५ आहे! जिच्यावर मी प्रेम केलं, तिचं पण नांव कुठेच येता कामा नये तरच मी ही कथा सांगेन’ मी त्याला शब्द दिला व त्याची घडलेली गोष्ट मन लावून ऐकू लागलो व पॅडवर उतरवू लागलो.

तो कारवारी कोकणी बोलत होता तेव्हा त्याच्याच शब्दात मी ती घटना पुढे देत आहे. :

त्या दिसान हांव हिंदू हायस्कूलात शिकतालॉ तीय बी मजे बरोबर त्याच वर्गान शिकताली. खिडकीकडचे ओळींन हांव पांचव्या बाकार बसतालो तर ती दाराकडच्या ओळीन दुसऱ्या बाकार. मास्तर शिकयतना मजी नजर मात्र तीजेर उरताली. मध्येच जर तिणे सहज फाटी पळयत, जाल्यार हांव नजर वळयतालो!

तिजे कडेन कशे उलवचे माका समज नाशील्ले.मज्या वळखीची आणी एक चली वर्गान आशिल्ली. हावे मागीर तिका सांगले की त्या चले बरोबर मजी गाठ घालून दी. नंतर एक आयतारा हांव बाजारात फिरतालो तेन्ना हावे तिगेल्या बापायक ३–३ भरील्यो पिशव्यो घेवन घरावतना पळयले. हांव धावत वचून त्यो पिशव्यो तागेल्या हाततल्यान घेतल्यो आणी म्हेळे ‘बाबा, तू इतल्या वतान कित्या इतलो त्रास घेता? हांवे घेता हे सामान आणी तुका घरा पावयता‘ ताका बरे दिसले आणी तो कौतुकान माका पळयत रावलो. आमी ताज्या घरा पावली. ‘अरे, तू अण्णालो चलो मरे? देव बरे करू तुजे’अशे म्हणत ताणे भितर उलो माल्लो आणी चलेक म्हटले ‘अगो ताका थंड लिंबा सरबत हाड मातशे’ हांवे नाका म्हटले नी भायर सरलो. वतना फाटी वळन पळैल्यार ती भितल्या पडद्यातल्यान माकाच पळैताली! नंतर मज्या मैत्रिणीन आमका दोघांक म्हाम्हायेच्या देवळाकडे या म्हटले. आम्ही थंय गेली. तीणे आमका दोघांक उलवच्याक वेळ दिलो.

थंय हावे म्हटले ‘माका तू खूप आवडता’ ताणेय मान हालयली आणी पटकन् मैत्रिणी बरोबर नाऽशी जाली! माका मन भन्न आयले. तीगेलो होकार आयकून! आता ताका केंन्ना नी कशे परते मेळचे हॉच विचार मनात येता आशिल्लो.नंतर काही दिस ती शाळेत आयलीच ना. माका धस्स झाले. आमच्या मैत्रिणीन सांगले ती शीक आसा म्हणून.

मागीर आमी दोगान ताज्या घरा वचचो प्लॅन केलो नी एक दनपारा आमी दोघी ताज्या घरान गेली. ताज्या बापयन सांगले ते भितर निजला ताका टायफॉयड झाला म्हणून, आमी ताका फक्त पळोवन आयली माका खूप वायट दिसले ताजी अवस्था पळोवन, पण हाव कायच करू शकलो ना. नंतर बेगीनच वार्षिक परीक्षा आयल्यो. हांव बी अभ्यासाक लागलो पण ताजो विचार सारखो मनात घर करून आशिल्लो. परीक्षा झाली पण ती परीक्षेक बी बसली ना. तिचे आजारपण आणि अशक्तपणान ती येऊ शकली ना. मज्या घरच्यांनी माका पुढल्या शिक्षणाक मुंबईत मगेल्या सुहासकाका कडेन धाडचे ठरयले. माका वच्चे पडले.

हांव तळमळतालो ताका लागून पण सांगतलो कोणाक? हांवे आमच्या मैत्रिणीक सांगले की हाव मुंबय वता आणि मजो पत्तो तिका दिलो. झाले. नंतर स महिने अशे गेले. तिगेली याद सारखी



सतायताली.गड सोडतना तिका मेळच्या जाय आशिल्ले अशे सारखे दिसताले पण ते जमलेच ना. दिवाळी सुट्टी पडली तसो हांव मुंबयच्यान गडार आयलो मनात, तिका मेळचेच म्हणून. हांगा आयल्यार माका कळले की ती आणी तिजो बापूय तिच्या सोयरीकेक बेळगांव गेल्यात!

हांवे आमच्या मैत्रिणीक मेळचे केले पण तीय बी दिवाळीक अंकोल्या गेल्ली. मजी रजा सरत आयली परतून मुंबय वचचो दिस आयलो नी तेन्नाच खबर आयली की तिका, मज्या मोगाक, बेळगांवच्या चल्यान पसंत केल्या. झाले. हांव म्हाम्हाये देवळान वचून बसलो नी रड रड रडलो. नंतर मुंबय वच्च्या भायर सरलो. बस तिच्या घरावैल्यान वतना हांव खिडकीतल्यान ती दिसता का पळयत आशिल्लो. मुंबय पावनापुडे सुहासकाकागेर परतो आयलो.

एक दिस काकाल्या टेबलार मज्या नांवाचे पत्र दिसले. अरे, माका पत्र कोणाचे आयला, हांवे ते पत्र उघडले. पळैल्यार मज्या मैत्रिणीचे जुने पत्र आशिल्ले! ‘अरे, बेगी किते तरी कर. तुगेल्या प्रेयसीक मागणी घालच्याक बेळगांवची मंडळी येतात. ती तुगेली वाट पळयता. ती स्वतः उलवू शकना म्हण तिनेच माका पत्र बरोवच्याक सांगला तरी तिका येवन मेळ. तिच्या बापायक सांग आमचे प्रेम आसा म्हणून वगैरे वगैरे... वेळ केन्नाच गेल्ली. मज्यान काय करच्या झाले ना.

नंतर हाव खूप शिकलो. बरी नोकरी मेळ्ळी. लग्न केले. सगळे सगळे झाले पण तिजी याद मज्या मनात आजही तश्शीच आसा. ती खंय आसा, कशी आसा, अजून जीवंत आसा की ना..... सगळेच प्रश्न अधांतरी...

टीप: वरील ही प्रेमकथा केवळ काल्पनिक असून प्रत्यक्षात अशी कोणीही व्यक्ती नाही.

– संपादक

## सरस्वती कला केंद्र, सदाशीवगड, कारवार






सरस्वती कला केंद्र, सदाशीवगड, कारवार या मंचातर्फे गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात १४.७.२५ रोजी पार पडला. खाली/वर दिलेल्या फोटोमध्ये बसलेली व्यक्ती श्री. दिनेश गडकर आहेत. त्यांच्या बरोबर उभे आहेत डॉ. संदीप अणवेकर (दंतवैद्य), पंडीत संकेत सप्रे, शेजवाड व श्री. रामा बांदेकर (कलाकार) नंदनगड्डा, कारवार.

ह्या समारंभाच्या निमंत्रण पत्रिकेचे प्रिंटींग प्रायोजक श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी (DNN) मुंबई हे आहेत.



## *एक अपूर्ण कथा*

७ फेब्रुवारी, २५ रोजी शिल्पा (नीता) हिच्या अनपेक्षित आणि अचानक निधनाने मी आणि सुशांत चिंताग्रस्त आणि दुःखात आहोत. आमच्या मनात अनेक विचार येत आहेत, पण मुख्य विचार असा आहे की–तिच्याशिवाय आमचं आयुष्य कसं चालेल? शेवटी, ती आमच्या छोट्या कुटुंबाचे हृदय होती.

गेल्या ४३+ वर्षाच्या माझ्या खूप आठवणी आहेत. प्रिन्स चार्ल्सने डायनाशी लग्न केले त्या दिवशी मी शिल्पाला पहिल्यांदा पारंपरिक मुलगी पाहण्याचे कार्यक्रमात पाहिले. शिल्पाचे रूप आणि व्यक्तिमत्वाने मला पूर्णपणे प्रभावित केले. मला खात्री होती की हीच माझ्यासाठी योग्य मुलगी आहे आणि मला माझ्या निर्णयाचा कधीही पश्चात्ताप झाला नाही.

आमचा सुरुवातीचा संघर्ष मर्यादित पैशात जगण्याचा होता. मी तिच्या व्यावहारिक जीवनाच्या दृष्टिकोनाचे कौतुक करायला शिकलो. महागड्या वस्तू किंवा प्रवासासाठी आमच्याकडे पैसे नसले तरी तिला काही हरकत नव्हती किंवा तक्रार नव्हती. ती नातेवाईक आणि मित्रांना आमच्यासोबत राहण्यासाठी किवा जेवणासाठी आमंत्रित करण्यास उत्सुक होती – तो खर्च स्वीकार्य होता.

तिचे सुशांतशी असलेले नाते असामान्य होते. ते आई आणि मुलापेक्षा मित्रांसारखे होते. मला नेहमी आश्चर्य वाटायचे की ते दोघे इतके वेळ कसे बोलू शकतात? सुशांत त्याच्या आयुष्यात काय घडत आहे ते सविस्तरपणे सांगायचा. ती ते सर्व लक्षात ठेवायची आणि त्याच्या मित्रांसोबत संवाद साधायची. सुशांत तिच्याशी विनोद करायचा, तिला मजेदार नावे ठेवायचा आणि तिला ते खूप आवडायचे. माझ्या एका मित्राने, ज्याने त्यांची मैत्रीपूर्ण गंमत पाहिली होती, तो म्हणाला, 'नजर लग गई.'

आमचे नातेही गेल्या काही वर्षात परिपक्व झाले होते. तिला बोलायला खूप आवडायचे आणि मला ऐकायला आवडायचे – आनंदी वैवाहिक जीवनासाठी हे एक चांगले संयोजन आहे! मला आनंद आहे की गेल्या पाच वर्षात आमच्यात होणारे वाद आणि भांडणे खूपच कमी झाली होती! तुम्हाला माहिती आहेच, तिला गप्पा मारायला खूप आवडत असे. तिच्या भाच्या किंवा जवळच्या शाळेतील मित्र मैत्रिणीचे फोन सहज तासाभराचे असायचे. ती सर्व पार्ट्यांमध्ये उत्साही व्यक्ती होती. ती सर्वांशी सहज मैत्री करायची, म्हणून आमच्या शेजाऱ्यांशी आमचे संबंध नेहमीच मैत्रीपूर्ण होते. ती माझ्या कुटुंबातील बाजूशी इतक्या लवकर एकरूप झाली की अल्पावधीतच ते माझ्यापेक्षा तिच्याशी जास्त संवाद साधू लागले! आमच्या नातेवाईकांमध्ये, आम्ही शिल्पा मामी/काकीच्या घरी राहतो! आमच्या सोसायटीत आम्हाला शिल्पाचा मुलगा आणि नवरा म्हणून ओळखले जाते.

शिल्पा एक उत्तम स्वयंपाकी आणि खवय्यी होती–आमच्यासाठी एक उत्तम संयोजन. आम्ही घरी इतके छान पदार्थ खाल्ले आहेत की अनेकांना आमचा हेवा वाटेल. तिची घर व्यवस्थापन क्षमता उत्कृष्ट होती आणि ती जे काम इतक्या लवकर आणि सहजतेने करत होती ते करण्यासाठी आम्हाला आता संघर्ष करावा लागतो.

जानेवारी २०१२ मध्ये माझ्या निवृत्तीनंतर, आम्ही खूप प्रवास केला, भारतात आणि परदेशातल्या सुंदर ठिकाणांना भेट दिली. आम्ही परदेशात ३००+ आणि भारतातील ३००+ सुंदर ठिकाणांना भेट दिली. आम्ही असंख्य नाटके आणि चित्रपट पाहिले आणि अनेक सुंदर खाण्याच्या ठिकाणांना भेटी दिल्या.



सर्वात महत्त्वाचे म्हणजे आम्ही नातेवाईक आणि मित्रांसोबत खूप पार्ट्या केल्या. आम्ही हे केले याचा मला खूप आनंद आहे. हे अनुभव आम्हाला कायमचे लक्षात राहतील. ती सप्तसोपनचा भाग होती. ६० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या उत्साही महिलांचा एक अद्भुत गट जो नियमितपणे त्यांच्या बालपणीच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी एकत्र येत असे. सप्तसोपनमध्ये गायन, नृत्य, मेंदूचे खेळ, कॅरम, संस्कृत, नाटक, वक्तृत्व आणि बरेच काही यासह विविध प्रकारचे मनोरंजक अभ्यासक्रम उपलब्ध होते! तिने तिच्या नवीन मैत्रिणीसोबतचे क्षण खरोखरच जपले आणि आनंददायी शिक्षण अनुभव उत्सुकतेने अनुभवले.

ती धार्मिक वृत्तीची होती. ती दररोज प्रार्थना आणि जप करत असे. चार दशकांहून अधिक काळ दर गुरुवारी श्री दत्त मंदिरात जात असे आणि दर २ ते ३ वर्षांनी एकदा गोव्यातील आपल्या कुलदैवताचे – श्री शांतादुर्गेचे दर्शन घेत असे आणि हे सर्व उपक्रम प्रामाणिकपणे आणि भक्तीने करत असे.

तिला इतरांची खूपच काळजी होती. तिला आपल्या जवळच्या नातेवाईकांच्या समस्यांमध्ये जितका रस असेल तितकाच तिला आपल्या मोलकरणीच्या समस्यांमध्ये रस होता. ती सर्व प्रकारच्या आव्हानांना धैर्याने तोंड देत, ताकदीचा आधारस्तंभ होती. बरेच जण तिच्याकडे सल्ला घेण्यासाठी येत असत आणि ती स्वेच्छेने ते देत असे. तिचा मंत्र होता सर्वांशी चांगले संबंध करणे आणि टिकवणे. इतरांची, विशेषतः तिच्या कुटुंबाची, नातेवाईकांची, मित्रांची आणि योग्य संस्थांची सेवा करणे, हे तिचे कर्म होते.

शिल्पाच्या दृष्टिकोनातून मृत्यूचा विचार केल्यास :

– तिचे अचानक, शांतपणे आणि चांगल्या प्रकृतीसह मनःशांतीपूर्ण अवस्थेत निधन झाले.

– तिचे जवळचे कुटुंबीय तिच्यासोबत होते; काय होणार आहे याची कोणालाही थोडीही कल्पना नव्हती.

– तिला ओळखणाऱ्या प्रत्येकाने तिला त्यांच्यासोबत जास्त काळ राहावे अशी इच्छा होती तेव्हा ती गेली. कदाचित हा सर्वोत्तम प्रकारचा मृत्यू असेल. आपल्यापैकी बहुतेकांना तिच्या मृत्यूचा हेवा वाटेल.

आमच्या दृष्टिकोनातून, तिच्या निधनाबद्दल शोक करण्याचे कारण आहे; वयाच्या ६५ व्या वर्षी तिचे निधन होणे योग्य नव्हते. दुर्दैवाने, तिचे खूप लवकर निधन झाले, परंतु आपल्यापैकी अनेकांना तिचा सहवास बराच काळ मिळाला याचे समाधान आहे. आपण सर्वांना तिच्या उत्साही उपस्थितीची आठवण येईल – सुशांत आणि मला ते अधिक जाणवेल.

या दुःखद घटनेनंतर आणखी एक जाणीव झाली की सुशांत आणि मला असंख्य नातेवाईक, मित्र आणि शेजारी आहेत जे खरोखरच आम्हाला प्रत्येक प्रकारे आधार देऊ इच्छितात. ते आम्हाला आपुलकी आणि मित्रत्वाच्या अत्यंत आवश्यक भावना या कठीण परिस्थितीत देत आहेत.

मला खात्री आहे की शिल्पाला आपण तिच्या मृत्यूवर जास्त काळ शोक केलेला आवडणार नाही. त्याऐवजी तिला आपण तिच्यासोबत घालवलेल्या चांगल्या क्षणांची आठवण करून चांगले आयुष्य जगलेले आवडेल.

भविष्यात जेव्हा आपण एकटे किंवा एकत्रित असू तेव्हा आपल्याला तिची नक्कीच आठवण येईल. त्यावेळी आपण हसून म्हणू : 'कुछ खास बात थी उसमे.'

– सुधीर (राजू) वर्दे. (शिल्पा (नीता) चे यजमान)

## रामेश्वर मंदीरात गुरुपौर्णिमा साजरी




रामेश्वर मंदीर, जोगेश्वरी येथे गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने श्रीमद् विद्याधीश तीर्थ स्वामीजी (श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ, पर्तमाळी, गोवा) यांचे १३.७.२५ रोजी रात्री ९.०० वाजता आगमन झाले. त्यांनी सर्व भक्त भाविकांना आपल्या प्रवचनाद्वारे गुरु महिमेचा जयजयकार करत सर्वांना कृपा आशिर्वाद दिले. तदनंतर नैवेद्य प्रसाद वाटप झाल्या पश्चात रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास पर्तगाळ मठाधीश स्वामींनी निरोप घेतला व ते त्यांच्या मठासाठी रवाना झाले.

**आषाढी एकादशी उत्सव रामेश्वर मंदीर, जोगेश्वरी येथे थाटामाटात साजरा झाला.**





## आलो एकटे जाणार एकटे ..... मग जगायचं कुणासाठी...?

माणूस जन्माला येतो, लहानाचा मोठा होतो. पुढे सुख दुःखाची अनेक वादळे झेलत आयुष्य जगतो. पण.. आयुष्य का जगतो? कशासाठी जगतो? आणि कुणासाठी जगतो? याची मात्र काहीच कल्पना नसते. पोटाची खळगी भरण्यासाठी आयुष्यभर काबाडकष्ट करतो. पैसा मिळवण्यासाठी कुठेतरी नोकरी करतो, लहान–सहान कामे करतो, अंगमेहनतीचीही कामे करतो. पूर्वी ६०/७० वर्षांचे आयुष्य जगायचा, आता ७०/८० वर्षे जगतो आणि मरून जातो. मेल्यानंतर कुटुंबीय, नातेवाईक चार दिवस रडतात आणि विसरून जातात. मेल्यानंतर पृथ्वीतलावरचं आपलं अस्तित्व मात्र कायमचच संपुष्टात येतं... आपण कितीही चांगले असलो तरी मेल्यानंतर आपली आठवण ही फक्त १५/२० दिवसांपुरतीच असते... कारण आपण जगलेलो असतो ते केवळ आपल्या कुटुंबापुरतंच. मी, माझं कुटुंब एवढंच जग असतं आपलं...

मग... जगावं तरी कुणासाठी?..तर...जगावं तर ते... समाजासाठी तुम्ही जगाच्या कोणत्या समस्या सोडवता? तुम्ही काय उभारता? तुम्ही कुणाच्या तरी कामी येता का? यालाच तुमचं करियर म्हणतात तर तुम्ही स्वतःच्या पलीकडे जाऊन जेव्हा विचार करता त्याला शिक्षण असं म्हणतात... करियर म्हणजे केवळ नोकरी मिळवणं किंवा व्यवसायात प्रगती करणे एवढाच संकुचित विचार नसावा. समाजाचा विचार करून जगणं म्हणजेच आयुष्य होय. खूप पैसा, गाडी, बंगला, दागदागिने आहेत म्हणून एखादा माणूस श्रीमंत असतो असे मुळीच नाही. चांगल्या सभावाचा, चांगल्या विचारांचा माणूस हाच खरा सर्वात श्रीमंत असतो. पैसा, गाडी, बंगला ही केवळ क्षणिक व भौतिक सुखाची साधने आहेत... यातील एकही वस्तू तुम्ही गेल्यानंतर तुमच्या सोबत घेऊन जाऊ शकत नाहीत. सोबत नेता ते तुमचं कर्म, तुमच्या प्रति असलेली समाजाची आपुलकी, आणि वर्षानुवर्षे काढली जाणारी तुमची आठवण हीच आयुष्यभराची कमाई असते...

आजवर पैशाने खूप श्रीमंत असणाऱ्या एखाद्या व्यक्तीची आपण आठवण काढतो असं मला तरी वाटत नाही. पण समाजासाठी झटणारे ते छत्रपती शिवाजी महाराज आणि अनेक थोर समाजसेवक आजही आपल्या स्मरणात आहेत. कारण ते जगले होते समाजासाठी. त्यांनी समाजाला काहीतरी दिलं म्हणूनच आजवर त्यांच्या आठवणी जिवंत आहेत. उदाहरण घ्यायचंच झाल तर आताच दोन दिवसांपूर्वी आपण ज्यांची पुण्यतिथी साजरी केली ते संत गाडगेबाबा... काय होते त्यांच्याकडे... फक्त हातात एक खराटा डोक्यावर फुटलेल्या मडक्याचं खापर आणि अंगावर फाटका सदरा. पैशाचा तर विषयच नव्हता.. चलनाचं एक नाणंसुद्धा खिशात नसायचं. गाव झाडत फिरायचं आणि एखाद्याने दिलेला भाकर तुकडा खाऊन आयुष्य जगायचं. पण त्यांनी जगाला अनमोल शिकवण दिली ती स्वच्छतेची आणि अंधश्रद्धा

निर्मूलनाची. याच विचारांमुळे आज ते अजरामर झाले. आपणही समाजात असं काही करतो का? समाजाला काही देतो का? भले नसेल आपली महती छत्रपती शिवाजी महाराजांएवढी की लोक आपल्याला वर्षानुवर्षे लक्षात ठेवतील. पण निदान एक पिढी तरी लक्षात ठेवेल एवढं कर्तृत्ववान व्हावं प्रत्येकाने, एकमेकांचा राग, द्वेष करत आयुष्य घालवण्यापेक्षा चांगलं रहायला शिका. ज्या कुटुंबासाठी आज जगतोय आपण, ज्या मुलांना लहानाचे मोठे करतोय... तीच मुलं तुम्हाला म्हातारपणात सांभाळतीलच याची कुठलीही शाश्वती नाही... म्हातारे झाल्यावर आई-बाप काय काहीच काम करत नाहीत म्हणून त्यांना एखाद्या वृद्धाश्रमात नेऊन ठेवलं जातं...बालपणासारखंच तुमचं म्हातारपणही जाईल असंही नाही. बालपणी लाड होतात तर म्हातारपणी हालअपेष्टाही सहन कराव्या लागतात. ज्या मुलांसाठी जगलो तीच मुले एका क्षणात परके करून जातील... या सगळ्यानंतर जीवनाच्या शेवटच्या क्षणी प्रश्न पडतो की आपण आयुष्यभर जगलो ते कुणासाठी?... समाजासाठी जगा... दान-धर्म करा... भुकेल्या माणसांना अन्न द्या..आनंदात जगून घ्या... फिरावसं वाटलं तर भरपूर फिरून घ्या... म्हातारपणी फिरावसं वाटलं तरी तुमचं शरीर मात्र साथ देणार नाही. येताना एकटे असलो तरी जाताना मात्र सर्वांचे होऊन जाण्यातच खरी मजा आहे...

– संकलन, प्रसाद कसबेकर

**'Gomant Vibhushan'**

On behalf of every Goan I am Proud to present the 'Gomant Vibhushan' to Shri Ajit Kadkade, a musical maestro whose voice echoes the soul of Goa across continents.

Born in Bicholim and rooted in Goan tradition, Shri Kadkade has dedicated over four decades to Indian Classical and Devotional music. Trained under the legendary Pt. Jitendra Abhisheki, his mastery spans ragas, bhakti sangeet, natyageet, abhangs and more-delivered in Konkani, Marathi, Hindi, and Kannada. With nearly 200 albums and performances across India, Europe, the US, and the Gulf, his contribution is a shining example of how one can stay rooted in Goa while reaching the world. As we confer Goa's highest civilian honour, we salute not just an artist, but a cultural ambassador who inspires generations.

Dr. Pramod Sawant, (Chief Minister, Goa)



Shri Ajit Kadkade





## व्यवस्थापन तज्ज्ञ सुरेश रामराव बोरकर

(जन्म : १९ डिसेंबर १९३६ : मृत्यु : १३ ऑगस्ट २०२५)

श्री. बोरकर यांचा जन्म कारवार येथे झाला. सी.ए.च्या परीक्षेत गुणवत्ता यादीत अखिल भारतामध्ये त्यांना १३ वा क्रमांक मिळाला होता. ते 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स व 'इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज्' या दोन संस्थांचे फेलो होते. एस्.के.एफ बॅकलाइट यांसारख्या आंतरराष्ट्रीय उद्योगसमूहामध्ये महत्त्वाच्या पदांवर काम केल्यावर ते कॅडबरी या नामांकित कंपनीत रुजू झाले व एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर या पदावरून निवृत्त झाले. टाटा हाऊसिंग डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन या कंपनीत २९ वर्षे संचालक म्हणून ते कार्यरत होते व टाटा ग्लोबलच्या हिमालयन वॉटर या कंपनीशीही ते संलग्न होते. व्यवस्थापक क्षेत्रातील त्यांच्या दांडग्या अनुभवामुळे बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्सच्या इकॉनॉमिक सब कमिटीमध्ये त्यांना मॅनेजमेंट कन्सलटंट म्हणून उद्योजक व व्यवसायिकांना मार्गदर्शन करण्यासाठी, व्याख्याने देण्यासाठी व परिषदांमध्ये सहभागी होण्यासाठी निमंत्रित केले जात असे.

आपल्या बॅंकेच्या संचालक मंडळावर त्यांनी एकूण १७ वर्षे काम केले. त्यापैकी ३ वर्षे सचिव, १ वर्ष उपाध्यक्ष (१९८४-८५) व ५ वर्षे अध्यक्ष (१९९५-२०००) म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला. त्यांच्या व्यवस्थापनातल्या सखोल अनुभवाचा लाभ त्यांनी बॅंकेला मिळवून दिला. त्यांच्या अध्यक्षीय कारकिर्दीत १९९६ साली बॅंकेला शेड्युल्ड बॅंक म्हणून दर्जा मिळाला व १९९७ साली बॅंकेला मल्टिस्टेट को. ऑप. बॅंक हाही दर्जा मिळाला. १९१७ साली स्थापन झालेल्या आपल्या बॅंकेची १९९७ पर्यंत म्हणजे सुमारे ८० वर्षे होऊनही बॅंकेची शाखा जिव्हाळ्याच्या कारवार शहरात नसावी याची खंत सर्वांनाच असे. श्री. बोरकर यांच्या अथक प्रयत्नाने १५ मार्च १९९७ रोजी कारवार शाखेचे उद्घाटन झाले व आपले स्वप्न साकार झाल्याचे त्यांना समाधान वाटले. महाराष्ट्राच्या बाहेर बॅंकेच्या पहिल्याच शाखेचे उद्घाटन करण्याचे श्रेय व मान. श्री. बोरकर यांनाच जातो.

१९९९ साली त्यांच्याच पुढाकाराने बॅंकेने ट्रेनिंग सेंटर सुरू केले. त्यामुळे बॅंकेत रुजू झालेल्या नवोदितांच्या तसेच इतर कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेमध्ये लक्षणीय वाढ झाली. त्यांच्या कारकिर्दीतच सर्वात वरिष्ठ अधिकाऱ्याला बॅंकेचा दैनंदिन कारभार चालविण्याची जबाबदारी देण्याची पद्धत सुरू केली व अशा अधिकाऱ्याला बोर्डामध्ये स्वीकृत करून कार्यकारी संचालक या नव्या पदाची निर्मिती केली. त्यामुळे कारभारात सुसूत्रता आणण्यात साहाय्य झाले. त्यांचे

आणखी एक योगदान म्हणजे त्यांनी बँकेचे आद्य संस्थापक शेठ शांताराम कुलकर्णी यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचे प्रतीक म्हणून त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रतिवर्षी एक व्याख्यानपुष्प आयोजित करण्याची प्रथा सुरू करण्यात त्यांनी घेतलेला पुढाकार. बँकींग, वित्तशास्त्र, व्यवस्थापन व तत्सम क्षेत्रातील जाणकारांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे स्तुत्य कार्य त्या योगे साकार झाले. या उपक्रमाचा आणखी एक हेतू म्हणजे सर्व समाजबांधवांना एकत्र आणणे व एकजूट करणे हाही होता. शिवाय संस्थापकाबद्दलचा आदरभाव नव्या पिढीलाही विदीत व्हावा म्हणून शेठ शांताराम यांचे छायाचित्र सर्व शाखा व बँकेच्या आस्थापनांमध्ये लावण्याचा निर्णयही त्यांचाच. बँकेचे व्यवहार पुढील काळात समर्थपणे चालविण्यासाठी त्यांनी रत्नपारख्यांच्या नजरेने कर्तबगार तरुण व्यक्तींना बँकेच्या संचालक मंडळात आणण्यासाठी खास प्रयत्न केले व त्यातूनच महेश आरस व किशोर कुलकर्णी यांसारख्या व्यक्ती संचालक मंडळावर आल्या यांत श्री. बोरकर यांची दूरदृष्टी दिसून येते.

श्री. बोरकर यांचे निरनिराळ्या सामाजिक संस्थांशी घनिष्ठ संबंध होते. रोटरी क्लबच्या उत्तर मुंबई जिल्ह्याचे अध्यक्ष हे प्रतिष्ठेचे पद त्यांना मिळाले होते. महालक्ष्मी येथील उच्चभ्रू सभासदांसाठी असलेल्या विलिंग्डन जिमखान्यांचे त्यांनी ४ वर्षे कार्यवाह म्हणून कार्य केले नाशिक येथील प्रथितयश शाळांपैकी प्रथम क्रमांकाच्या शाळेच्या कार्यकारिणीमध्ये ते तब्बल १८ वर्षे कार्याध्यक्ष होते.

कर्तव्यनिष्ठा व निष्काम कर्मसेवा यांचे आदर्श असलेले श्री. व्ही. डी. मुझुमदार, श्री. पुटप्पा नाडकर्णी, श्री. मनोहर कसबेकर, श्री. माधव धुमे व खानसाहेब दौतीवाला यांसारख्या व्यक्तींशी श्री. बोरकर यांचा संपर्क आला. त्यासाठी ते स्वत:ला भाग्यवान समजत व त्यांच्या स्वतःच्या जडणघडणीत त्यांचे ऋण मान्य करत.

आपल्या एज्युकेशन सोसायटीच्या पूर्वीच्या अधिनियमानुसार विश्वस्त नेमण्याची तरतूद होती. त्यानुसार श्री. बोरकर यांनी अनेक वर्षे विश्वस्त म्हणून महत्त्वाचे योगदान दिले. त्या प्रीत्यर्थ एज्युकेशन सोसायटीच्या १९९७ सालच्या सर्वसाधारण सभेत त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करण्यात आले. त्या वर्षी ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

त्यांच्या निधनाने आपल्या बँकेचेच नव्हे तर अनेक वित्तीय संस्थांचे मदतगार हरपल्याचे दुःख समाजातून व्यक्त होत आहे.

त्यांच्या आत्म्यास अखंड शांती लाभो, हीच श्री मंगेशाचरणी विनम्र प्रार्थना.

– डी. एन्. नाडकर्णी



## ठाणे मंच महिलांचा श्रावण स्नेह मेळावा

मंगळवार दिनांक ५.८.२५ रोजी मुलुंड येथे ठरल्या प्रमाणे वरील स्नेह मेळावा झाला.
उपस्थिती ३० महिलांची झाली.
अल्पोपाहारात मसाले दूध खास आकर्षण होते.
श्रीमती स्मीता वाघ, ज्योती सुखटणकर तसेच प्रिया आकेरकर यांनी गायलेल्या गोड गाण्यांनी कार्यक्रमाला रंगत आणली.




## महिलांचा श्रावणातला स्नेहमेळावा, जोगेश्वरी.




नेहमीचा श्रावणातला महिलांचा स्नेहमेळावा समारंभ यंदा १ ऑगस्ट २०२५ रोजी रामेश्वर मंदिर सभागृह, सरस्वती बाग जोगेश्वरी येथे संपन्न झाला. जवळ जवळ १०० महिलांनी कार्यक्रमात भाग घेतला व कार्यक्रम यशस्वी केला.
अल्पोपाहार म्हणून बटाटा वेफर्स, तिरंगी ढोकळा, थंड पेये व चिक्की देणात आली.

एकंदरीत समारंभ फारच छान झाला.

शांता पालेकर – मो.नं. ८८५००६६३८३

**मुंबईतील भगिनींच्या तिळगुळ समारंभा बाबत सूचना**
**(मकरसक्रांतीच्या आसपास)**

आपल्या ज्ञातीतील मुंबईच्या सर्व भगिनींना नम्र विनंती आहे की २०२६च्या जानेवारी महिन्यात दरवर्षी आपण करत असलेला (मकरसंक्रांतीच्या आसपासचा) तिळगुळ समारंभ यंदाही करावयाचा आहे. समारंभाचे ठिकाण गेल्या वर्षीप्रमाणेच माहीम येथील 'मिराज लँडस्केप टॉवर'मध्ये आहे. आमची विशेषकरून माटुंगा-दादर-माहीम येथे रहात असलेल्या आपल्या भगिनींना विनंती आहे की आपण या कार्यक्रमाची जबाबदारी उत्स्फूर्तपणे व हिरीरीने स्विकारावी, त्याप्रमाणे कार्यक्रमासाठी लागावयाच्या सर्व वस्तू, भेटी, तसेच चहा, पाणी, फराळाची व्यवस्था करावी.

तुमची कार्यक्रमाची तारीख पक्की झाली की संपादक-मुखपत्रिका यांना कळवावी त्याप्रमाणे जानेवारीच्या मुखपत्रिकेच्या अंकात आम्ही ती घालू व सर्व ज्ञाती भगिनींना निमंत्रित करू. कार्यक्रमाचा जो काही खर्च असेल तो संघ अध्यक्षांना कळवावा. त्याची व्यवस्था करण्यात येईल.

तरी हा कार्यक्रम यशस्वीरीत्या आपण सर्व भगिनी मिळून कराल अशी आशा करतो.

आपला नम्र,
प्रसाद कसबेकर , संपादक - मुखपत्रिका (मो. ९८२०५०१५५१)

**शमिका जोशीला ब्रॉंझ**


**शमिका जोशी**

पुणेः अभिनव विद्यालयाची शमिका जोशी हिने जम्मू येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय न्हिदमिक जिम्नॅस्टिक स्पर्धेसाठीच्या निवड चाचणीत ब्रॉंझपदक मिळवले. या यशामुळे शमिकाने १८ ते २२ जून दरम्यान सोफिया (बल्गेरिया) येथे तिसऱ्या एफआयजी न्हिदमिक जिम्नॅस्टिक्स ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.


**SHREE HOMOEPATHIC PHARMACY**
**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoepathic Medicines**
Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,
Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**
**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**
**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**




## *'गेले ते दिन गेले' - आमची सीता चाळ*
## प्रतिसाद

(वरील लेख प्रसाद कसबेकर यांनी जुलै ते सप्टेंबर २०२५च्या मुखपत्रिकेत लिहिला, त्याला अनेक वाचकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. जवळजवळ ३० व्हाटस्‌ॲप मेसेजीस, ७ टेलिफोन्स व अमेरिकेतील ३ वाचकांनीही इ-मेल द्वारे कौतुक केले. त्यांनी सर्वांनी या लेखाच्या निमित्ताने 'जुने दिवस आठवले' असे नमूद केले.

या समस्त ज्ञातिबांधवांचे मनापासून धन्यवाद. त्यातलाच एक भाग म्हणून अजून सीता चाळीत रहाणाऱ्या (शांता) क्षमा बोरकर यांचा प्रतिसाद खाली देत आहे.)

कालाय तस्मै नमः

पंकजदादा (प्रसाद) तुझा सीता चाळीवरचा लेख वाचून मलासुद्धा सीता चाळीतले माझे बालपण, तारुण्य व आताचे दिवस आठवले. सीता चाळीतले 'रम्य ते बालपण' व त्या गमती जमती.... ती सर्व लोक ...हे सगळे फेर धरून माझ्या डोळ्यांसमोरून नाचू लागले... आज खूप काही बदलले आहे, आणी सीता चाळ पण काळासह बदलली... आता उरल्या त्या सुखद... गमतीशीर व काही दुःखद आठवणी. D.G.T. शाळा, वखार, दुकाने बंद पडली, फेरीवालेदेखील येईनासे झाले, बाल्कनीत आपले वळकटे टांगलेले नोकरदेखील गेले... सीतेची रयाच गेली... पण पूर्वीची २-३ बिऱ्हाडे आहेत अजून. बाकी लोकांना देवाज्ञा झाली... त्यांची मुले परदेशी रहायला गेली - काही उपनगरात गेली. असो. बरेच काही बदलले.

तू यमुताईची आठवण काढली व मला अगदी गलबलून आले. अशा तिच्या तसेच तुझ्या आजीच्या व इतर लोकांच्या आठवणी अजून मनात जोपासून ठेवल्या आहेत. तुझ्या लेखाने त्या आठवणी उजागर केल्याबद्दल तुझे धन्यवाद.

सीता चाळ अजूनही १२५ + वर्षे आपल्या पायावर थरथरत का होईना उभी आहे. चाळीच्या भागात आलास तर जरूर ये. मी यमुताईंच्या घरात तळमजल्यावर रहाते. खूप गप्पा मारू व चाळीच्या आठवणीत पुनश्च आपल्या बालपणीच्या आठवणीत रमू या.

(लेखिका : श्रीमती शांता माधव बोरकर)

**ठाणे मंच - ३० नोव्हेंबर रोजी सकाळच्या सत्रात तेंडूलकर हॉल मध्ये होणारा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

## *मुंबई मंच - आनंद मेळावा*

**रविवार, ११ जानेवारी २०२६**

मुंबई मंच आयोजित 'आनंद मेळा २०२५' ला तुम्हां सर्वांकडून तसेच स्थानिक रहिवाश्यांकडून मिळालेल्या उदंड प्रतिसादाबद्दल आम्ही मुंबई मंच सभासद आपल्या सर्वांचे अत्यंत आभारी आहोत. आम्हाला कळविण्यास आनंद होत आहे की येत्या वर्षीही ११ जानेवारी २०२६ रोजी मुंबई मंचने 'आनंद मेळा २०२६' करण्याचे योजिले आहे. आगामी आनंद मेळा आपली कलाकृती, व्यवसाय, लघु उद्योग आणि पाककला सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी पुन्हा एकदा उत्तम व्यासपीठ ठरणार अशी आशा आहे. आपण खाली दिलेल्या कोणत्याही प्रकारे यात सहभागी होऊ शकता :

१) खाद्य पदार्थांचा लाईव्ह स्टॉल

२) सुके खाद्य पदार्थ, केक्स, फराळाचे पॅकेज स्टॉल

३) मनोरंजक खेळांचा स्टॉल

४) कलाकुसरीच्या वस्तू, कपडे, पर्सेस, शोभेच्या वस्तू, इतर लघु उद्योग स्टॉल

५) इन्वेस्टमेंटस् स्टॉल

६) प्रायोजक /(Sponsership) स्वतःचे बॅनर, व्यवसाय पत्रिका (Flyer), भित्ती पत्रक.

७) देणगीदार (Donations) : आपल्या ज्ञातीचा हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी आपल्या सढळ आर्थिक मदतीसाठी मुंबई मंच तर्फे नम्र आवाहन.

मेळ्याचा प्राथमिक तपशील पुढील प्रमाणे :

तारीख : रविवार, १९ जानेवारी २०२६

स्थळ: के. जी. एस्. सोसायटीचे पटांगण, जोगेश्वरी पूर्व, मुंबई

वेळ : सायंकाळी ४.३० ते ९.३०.

स्टॉल बुकींग्स ३ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू. (First come first Serve basis)

कार्यक्रमात काही बदल झाल्यास स्टॉल होल्डर्सना पूर्व सूचना दिली जाईल.पुढील मुखपत्रिकेत या कार्यक्रमाबद्दल 'रिमायंडर' देण्यात येईल. तुम्हां सर्वांच्या भरघोस प्रतिसादाची अपेक्षा आहे.

इच्छुक स्टॉल होल्डर, प्रायोजक आणि देणगीदारांनी मुंबई मंचच्या खाली दिलेल्या सभासदांकडे संपर्क साधावा :

| | |
|---|---|
| प्रदीप दाभोळकर – ९०६४००६३०८ | अमीत वाघ – ९८२०५२४३३९ |
| वंदना सोहनी – ९८१९२१०३५४ | संगीता कसबेकर – ९८१९४१६३३८ |
| मुकुंद नाडकर्णी - ९८२०८०८३८७ | प्रसाद गायतोंडे – ९८१९४११३३७ |



## 'सर्वप्रथम सेवा' याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस् वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफ्टमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारून मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टू झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या अनेक संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयलसारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरू करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

**उद्दिष्ट :** सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवाश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करू तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरू करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करू. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

**संपर्क : न. अ. जोशी : ९८१९३०४५९९/९९२०४०४५९९**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** पोस्ट बॉक्स ११९९०, आझादनगर पोस्ट ऑफीस,
अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३.

**SERVICE FIRST®**

98193 04599 99204 04599

**सर्वप्रथम सेवा®**

**SOCIETY SERVICE RESOURCE**

## एनकेजीएसबी बँकेचा १०८ व्या वर्षांत प्रवेश


सीए हिमांगी नाडकर्णी, अध्यक्ष, एनकेजीएसबी को. ऑप. बँक

भारतीय वित्तीय व्यवस्थेत सहकारी बँकांचे महत्त्व अधोरेखित आहे. स्थानिक संकल्पना आणि विस्तृत शाखा–जाळ्यामुळे एनकेजीएसबी बँकेने खातेदारांशी दृढ नाते जपले आहे. सातत्य, विकास, प्रयत्नशीलता आणि विश्वास या मूलभूत मूल्यांवर बँक कार्यरत आहे. देशातील ज्येष्ठ सहकारी बँकांपैकी एक म्हणून एनकेजीएसबीने स्थिर व शाश्वत प्रगती साधली आहे.

१०८व्या वर्षांत प्रवेश करताना बँकेने पाच राज्यांतील १०४ शाखांतून १३,८९९ कोटी रुपयांचे व्यवहार नोंदवले आहेत. अध्यक्ष सीए हिमांगी नाडकर्णी यांच्या नेतृत्वाखाली ग्राहकाभिमुख सेवा, डिजिटल गुंतवणूक आणि एमएसएमई क्षेत्रातील सहभाग वाढला आहे. क्लाऊड–आधारित डिजास्टर रिकव्हरी सोल्युशनमुळे तांत्रिक सक्षमतेची खात्री मिळाली असून आगामी वर्ष प्रगती, समाधान व विश्वास अधोरेखित करेल.

## ठाणे मंच सहल - १ दिवसाची

तारीख : १८ जानेवारी २०२६ (रविवार) आकार : प्रत्येकी रुपये ८००/–
बस सेवा : जोगेश्वरी, माहीम, ठाणे–मुलुंड येथून सुटेल.
प्रथम पैसे भरणाऱ्यास प्राधान्य.

पैसे भरण्याची सुविधा -
NKGSB Bank Ltd. Naupada. Thane Branch
SB A/c - 020100100001816 IFSC - NKGS0000020
ठिकाण : पाटील फार्महाऊस, विरार किंवा एच डी बीच रिसॉर्ट–वसई
ह्या सहलीतच संक्रांत तिळगूळ समारंभ आयोजीत केला आहे–
सर्वांचा तिळगूळ देऊन सन्मान केला जाईल.
संपर्क : सुरेश पालेकर - ८९२८८५०१९३ राजेश दिवेकर - ९६१९३६२४६०
गिरीश रेगे - ९९२२९६८७२५.

## विवाह /वाङ्‌निश्चय

१) निकीता राजेश बर्डे, अमेरिका व सुवामय सिल, अमेरिका
या उभयतांचा साखरपुडा हल्लीच अमेरीकेतच पार पडला.
(राजेश बर्डे हा डी.एन्. नाडकर्णी यांची बहिण शीला बर्डे यांचा मुलगा आहे.)



## लोकसत्ता गणेशमूर्ती उत्सवात 'मुंबईचा राजा' या प्रतिष्ठित समजणाऱ्या स्पर्धेचे प्रायोजक आपली एन.के.जी.एस.बी. बँक.

गणेशोत्सवाची तयारी, स्थापनेपासून विसर्जनापर्यंत धावपळ, पूजा, आरती व प्रसाद वितरण, दर्शनाखाली गर्दीचे नियंत्रण, विसर्जनाच्या प्रसंगी वाजतगाजत निरोप, या सगळ्या कार्यक्रमात मनापासून रमलेले कार्यकर्ते, कारागीर, कलाकार, मूर्तिकार या सगळ्यांच्या कष्टांच्या कौतुकाची दाद म्हणून 'लोकसत्ता गणेश उत्सवमूर्ती' ही स्पर्धा भरविली जाते. या पुरस्कारांचा वितरण समारंभ ९ सप्टेंबर रोजी रवींद्र नाट्यमंदिर येथे धूमधडाक्यात संपन्न झाला. सजावट, कलात्मकता, पर्यावरणाचे भान जपण्याचा प्रयत्न, जनजागृतीसाठी केलेले अनोखे कार्यक्रम, ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण अशा विविध निकषांवर 'मुंबईचा राजा' याची निवड होते. कुलाबा ते कल्याण आणि नवी मुंबई परिसरातील भौगोलिक विभागातील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत हिरिरीने भाग घेतला.

या संपूर्ण स्पर्धेचे प्रायोजकत्व स्वीकारण्याचा मान आपल्या बँकेला मिळाला. पुरस्कारांचे वितरण अध्यक्ष हेमांगी नाडकर्णी, उपाध्यक्ष शांतेश वर्टी, संचालक शशांक गुळगुळे व संपादक गिरीश कुबेर यांच्या हस्ते झाले. प्रयोजकतेसाठी आपल्या बँकेची निवड झाली, त्यामुळे '**आमगेल्या**' बँकेचे अभिनंदन.

## कविवर्य बाकीबाब




'लोकसत्ता'तर्फे कविवर्य बा. भ. बोरकर यांच्यावरील 'बाकीबाब' या विशेषांकाचा प्रकाशनोत्तर सोहळा २८ जून रोजी दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. याप्रसंगी (डावीकडून) एन. के.जी.एस.बी. को–ऑपरेटिव्ह बँकेचे सी.ए. शांतेश वर्टी, वीणा वर्ल्डच्या करिष्मा गोगटे, लोकमान्य मल्टीपर्पज को–ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या माधुरी टिनी गायक चंद्रकांत काळे, गायक–संगीतकार मिलिंद जोशी, अभिनेता वैभव मांगले, कवयित्री नीरजा, अभिनेत्री मधुरा वेलणकर, अभिनेत्री प्रतीक्षा लोणकर, अभिनेता अविनाश नारकर, कवी वैभव जोशी, रंगकर्मी अजित भुरे, एम. के. घारे ज्वेलर्सचे उदय घारे, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे डॉ. श्रीरंग जोशी, एम. पी. ग्रुपचे मंगेश परुळेकर आणि निवेदक कुणाल रेगे, बोरकर यांच्या अर्थगर्भ, चित्रवाही शब्दसाज ल्यालेल्या लयबद्ध कविता, बोरकरांचे किस्से, त्यांचा जीवनप्रवास अशी समग्र 'बाकीबाब' संध्या अनुभवताना रसिक मंत्रमुग्ध झाले.

**डॉ. सतीश वाघ** (अध्यक्ष, सुप्रीया लाईफ सायन्स.), यांनी २ ऑगस्ट २०२५ रोजी श्री बद्रीनाथ केदारनाथ मंदीर समिति कार्यालयाचे डेहराडून येथे उद्‌घाटन केले. त्यांच्या समवेत कार्यालयाचे अध्यक्ष व पर्यटन मंत्री उपस्थित होते.



## Utkarsh Small Finance Bank

Aapki Umeed Ka Khaata



### A Stalwart's Salute

**An Ode to Nagesh Dinkar Pinge Our Exteemed Director**

In boardroom calm and ledger light,
Where numbers whispers Utkarsh's might
You lent your mind, both sharp and wise,
To facts beneath the fiscal guise.
With Finance deep and Audit wide,
You kept the books on honor's side,
Each journal entry, clause, end chart
You combed with care yet with an Eagle's eye.
When silence fell en audit trails.
You'd spot the gaps and read the tales
A champion of what's fair and right,
You turned the grey into clear white.
A voice of reason, loud and bold,
With questions worth their weight in gold
And when the minutes stretched too long,
You brought them back with wit and song

Not just a mind for P&L,
But one who knew the stories well,
Of ethics, checks, and balance beams -
You stood at guard for bigger dreams.
Now as we bid a fond adieu,
We raise our glass in thanks to you.
Not for the spreadsheets you mode sing-
But for the trust you chose to bring.
Take this bow, you've earned it well,
In every line, your gegacy'll dwell.
The audit trails may end in ink,
But your imprint's deeper than we think.

Warmest wishes,
Board of Directors
**Utkarsh Small Finance Bank.**

***



In the Sneh-Sammelan to be held on 30th Nov. 2025, Shri. Arun Bhasker Kasbekar would be conferred Hon. Membership of the Education Society.
He has confirmed and accepted the same.

**श्री अरुण कसबेकर हे एज्युकेशन सोसायटीचे सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत.**

यांचे नाव आता बहुतेक ज्ञातिबांधवांच्या परिचयाचे झाले आहे. २०१६ सप्टेंबर रोजी एज्युकेशन सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न आली. त्या वेळी त्यांना संघाचे सन्माननीय सभासद म्हणून एकमताले स्वीकृत करण्यात आले. पृष्ठ २ वर नमूद केल्याप्रमाणे ३० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनात त्यांचा जाहीर सत्कार करण्यात येईल. ८७ वर्षांचे कसबेकर यांचे शालेय शिक्षण कारवारच्या प्रख्यात हिंदू हायस्कूलमधून झाले. तेथील ऋषितुल्य शिक्षकांचा त्याग व त्यांच्या आचार–विचारांच्या संस्कारांचा कसबेकरांच्या आयुष्यावर बराच प्रभाव पडला. मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधून एम.एस्सी. (प्युअर मॅथेमेटिक्स)ची फायनल परिक्षा अवध्या ३ महिन्यांवर असताना कसबेकरांना ‘इस्को’मध्ये अतिशय सुरेख जॉब मिळाला. त्या जॉबकरता MIT (USA) तसेच लंडनहून Ph.D. झालेले उमेदवार पण प्रयत्न करीत होते, अशा सोन्यासारख्या संधीचा कोणीही अव्हेर करू शकत नव्हता. जॉब मिळताच त्यांना कंपनीच्या बर्नपुरला असलेल्या स्टील प्लांटमध्ये ६ महिन्याच्या ट्रेनिंगला पाठवले गेले. स्वतःच्या कर्तबगारीने तें कलकत्ता येथे झोनल मॅनेजर (इस्ट इंडिया) या पदावर पोचले. पण काही कौटुंबिक कारणासाठी त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला व मुंबईत येऊन स्वतःचा व्यवसाय सुरू केला. कंपनीत असताना अनेक गरजू संस्थांना त्यांनी मदतीचा हाल दिला. नोकरीतून राजीनामा दिल्यावर त्यांनी पनवेल येथे अतुलीना केमिकल्स (इंडिया) प्रा. लिमिटेड या नावाने फॅक्टरी सुरू केली. कीटकनाशक औषधनिर्मितीमध्ये पी.एन्.पी. हा महत्त्वाचा घटक आहे त्याची पूर्वी परदेशातून आयात करावी लागत असे. त्याची त्यांनी आपल्या कारखान्यात निर्मिती करण्यास सुरुवात केली व त्या वेळी दुर्मिळ असलेले परकीय चलन वाचवून अप्रत्यक्षपणे देशसेवाच केली. पाच वर्षे त्यांनी बनविलेले पॅरासिटामॉल डुफार इंटरफ्रान कंपनी ‘क्रोसीन’ या नावाने विकत असे.

श्री. कसबेकर व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. मंगला (प्रभा) यांना अंध व्यक्तींविषयी विशेष कणव आहे. अंधासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना ते सढळ हस्ते आर्थिक सहाय्य देतातच, तसेच कित्येक अंध विद्यार्थ्यांना त्यांनी वैयक्तिक पातळीवर मदत केलेली आहे. एका विद्यार्थाला तर त्यांनी Ph.D. होईपर्यंत मदत केली होती. त्या शिवाय १० जणांच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रियांचा खर्चही त्यांनी केला आहे. अनेक धर्मदाय विशेषतः वृद्धांसाठी ते सतत भरघोस देणग्या देत असतात. आपल्या संघाच्या वृद्धसेवा निधीसाठी त्यांनी १९ प्रसंगी देणग्या दिलेल्या आहेत. त्यांची एकूण रक्कम १ कोटी २५ लाखाच्याही वर आहे.

त्यांचे ‘कवडसे मनाचे’ हे पुस्तक ३० सप्टेंबर २०२२ रोजी प्रसिद्ध झाले. या पुस्तकाचे वाचकांनी कौतुक केले. सौ. मंगला व श्री. अरुण कसबेकर यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये एज्युकेशन सोसायटीला २५ लाख रुपयांची भरघोस देणगी दिली. या देणगीमुळे ग्रॅज्युएशन व पोस्ट ग्रॅज्युएशन करणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना अधिक वाढीव मदत देण्यात आली.

***

Smt. Anna Neeraj Kasbekar would be Honoured by the Education Society with the special outstanding achievement Award in the Sneh-Sammelan to be held on 30th Nov. 2025,

Her husband is Dr. Neeraj Kasbekar & they stay in Norway. She has summited Mt. Everest.

Smt. Anna Neeraj Kasbekar, Summited Mounts Everest, the tallest mountain on this planet on 18th May 2025. This is an outstanding achievement. Her parents introduced her to the mountains when she was in the primary school.

This turned into a passion when she met her husband Dr. Neeraj Kasbekar during dental school. They both stay in Norway and shared the same passion for going to the new places and travelling the globe.

Following are the extracts from the Article written by Smt. Anna Neeraj Kasbekar. "Seven summits are the highest on each of the continents, why not climb all of them, I thought. Me and my husband travelled to Tanzania in 2019 and climbed Kilimanjaro along with safari.

I wanted to give the seven summit project a try. I like challenging myself and developing new skills. Also you only live once and there's only one way to find out - by trying, This is how first of the seven summits appered on my list. It was 2013 and we were travelling to Australia, Mount Kosciuszko was just a walk in the park. Me and Neeraj had signed up for Elbus Russia. Then covid-19 happened followed by the war between Russia and Ukraine, so we went for an alternative peak in Europe, Mount Blanc (France) we stood on top of it in July 2023.

On Chrismas Eve in 2013, I summited Mount Vinsen in Antarctica. As I landed back in South America, I headed up for Aconcagua (Argentina) which I summited on January 11th 2024. Five months later, I stood on top of Denali (USA). The highest mountain in North America.

Reaching the summit of Mount Everest felt unreal. I climbed all the way to the top, where the prayer flags are attached, and looked around in disbelief. That's it! I am on top of the world.I unzipped the pocket in my summit suit to take out the flags.

I was on the summit for about 10 minutes. We didn't have unlimited amount of oxygen bottles. So it was time to descend. I returned to South Col in the afternoon, slept the night there and descended all the way to Everest Base Camp the following day.

My husband and one of my friends did an amazing job at reminding me that I am capable of fulfilling my dream.

***



## *शांतादुर्गा देवस्थान, कवळे, गोवा*

**येथे महाजनांसाठी अभिषेक फॉर्म**

**महाजन कोड:** ______________ **ईमेल :** ______________

| | |
|---|---|
| १. पूर्ण नाव: | १३. आजीचे आडनाव (विवाहापूर्वी) (वडिलांची बाजू)✻: |
| २. महाजनाचे गोत्र: | १४. आजीचे गोत्र (वडिलांची बाजू): |
| ३. महाजनाचे कुलदेव: | १५. आजीचा कुलदेव (वडिलांची बाजू): |
| ४. वडिलांचे पूर्ण नाव: | १६. आजीच्या स्वामीजींचे मठ: |
| ५. आईचे लग्नापूर्वीचे पूर्ण नाव: | १७. आजीचे आडनाव (विवाहापूर्वी) (आईच्या बाजूने) |
| ६. आईचे गोत्र: | १८. आजीचे गोत्र (आईच्या बाजूने): |
| ७. आईचा कुलदेव: | १९. आजीचा कुलदेव (आईच्या बाजूने): |
| ८. आईच्या स्वामीजींचे मठ: | २०. आजीच्या स्वामीजींचे मठः |
| ९. पत्नीचे लग्नापूर्वीचे पूर्ण नाव (विवाहापूर्वी): | २१. पत्ता✻: |
| १०. पत्नीचे गोत्र (विवाहापूर्वी): | २२. मोबाईल क्रमांक✻: |
| ११. पत्नीचा कुलदेव (विवाहापूर्वी): | २३. वैवाहिक / स्थिती✻: |
| १२. पत्नीच्या स्वामीजींचे मठ (विवाहापूर्वी): | |

ठिकाण: पुरोहित निवाडा : शांताराम सरज्योतिषी/

दिनांक: – वर्ष विनायक पेंडसे

मी येथे शपथ घेतो की, वरील माहिती माझ्या माहितीनुसार खरी आहे आणि काहीही खोटे नाही

तारांकित (✻) फील्ड अनिवार्य आहेत

महाजनची स्वाक्षरी पुरोहित सत्यापित

सचिवांची मंजूरी



पद्मभूषण डॉ. पद्माकर रामचंद्र दुभाषी
जन्म : ५ मार्च १९३०
देवाज्ञा : ३१ ऑगस्ट २०२०

## श्रद्धांजली

'हेंचि अनुभवें तेंचि पाहे रूप तया' ॥ ५४५ ॥
**श्री ज्ञानेश्वरी, १५ वा अध्याय**

अशीच ती वस्तु आहे हें अनुभवानेच
जाणवायचे असते, किंवा
अनुभवी तेच जाणतो,
असे उत्तम पुरुषाचे रूप आहे.



श्रीमती सिंधू पद्माकर दुभाषी
देवाज्ञा १३ सप्टेंबर२०२१
जन्म : २० सप्टेंबर१९३८

*प्रेम देऊनी आम्हांला जवळ केले सर्वांना ।*
*उरली साथ तुमची, आठवणी येते क्षणाक्षणाली ॥*
*कल्पनेतही नव्हते तुमचे जाणे अधुरे राहिले जीवन गाणे ।*
*आता फक्त एकच उरले तुमच्या स्मृतीला श्रद्धांजली वाहणे ॥*

**– मेधा, देवदत्त, अर्चना (नात), जय (पणतू) –**
**डॉ. मेधा दुभाषी – Head of Centre for Gender Studies**
**Vaikunth Mehta National Institute ofCo-operative Management, Pune, INDIA**

## ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

## श्रीमती कुसुम प्रभाकर स्थळेकर



**(जन्म:१७–१२–१९३१ मृत्यू : २३–५–२०२४)**

*तो हसरा चेहरा, नाही कोणाला दुखवले । मनाचा तो भोळेपणा,*
*नाही केला मोठेपणा । सोडूनी गेली अचानक... नव्हती कुणालाही याची जाण ।*
*पुन्हा परतूनी यावेस हीच आमची अपेक्षा ।*
*देव तुझ्या आत्म्यास शांती देवो हीच प्रार्थना*

**मुलगाः दुर्गादास स्थळेकर.**
**मुलगीः संध्या सामंत, ज्योती करूर तसेच नातवंडे, सुना व जावई**



# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या (मागील अंकानंतर ) उल्लेखनीय देणग्या

### १. श्रीमती सविता व श्री. किशोर वासुदेव सबनीस यांच्या स्मरणार्थ पाच लाख रुपयांची देणगी

ठाणे येथे राहणारे श्री. किशोर वासुदेव सबनीस यांनी पत्नी सविता यांच्या नावे 'सविता सबनीस फाऊंडेशन' असा विश्वस्त निधी स्थापन केला होता. या निधीतर्फे ते संघाला वेळोवेळी आप्तेष्टांच्या स्मरणार्थ देणग्या देत असत. श्री. सबनीस यांचे अलीकडे ६ मे रोजी दुःखद निधन झाले. त्यांचे पुत्र श्री. महेश व कन्या सौ. निशा केदार पालेकर यांनी आईवडिलांच्या स्मरणार्थ संघाला पाच लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### २. श्रीमती रमाबाई व श्री. विश्वनाथ यशवंत तेलंग यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ संघाला पाच लाख रुपयांची देणगी

आपल्या संघाचे उपाध्यक्ष श्री. शिरीष दिनानाथ वाघ यांच्या कुटुंब वत्सल पत्नी म्हणजे सौ. संगीता यांनी आपल्या मुखपात्रिकेसाठी काही वेळा लेखन केले आहे. सुमारे दहा वर्षापूर्वी त्यांची 'आमेगेले कारवार' ही कोकणीतून लिहिलेली हृदयस्पर्थी कविता प्रसिद्ध झाली होती. ती अद्यापही कित्येकांच्या स्मरणात आहे.

संगीताताईनी अलीकडेच आपले आईवडील श्रीमती रमाबाई व श्री विश्वनाथ यशवंत तेलंग यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ संघाला पाच लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### ३. श्री. अविनाश वाघ यांच्यातर्फे वृद्ध सेवा निधीसाठी आणखी दोन लाख रुपयांची देणगी.

बोरीवली येथे राहणारे श्री. अविनाश मधुकर वाघ यांच्या पली सौ. अंजली यांचे अलीकडेच जून महिन्यांत दुःखद निधन झाले. त्यापूर्वी २०२० मध्ये त्यांची बहिण कु. शकुंतला वाघ यांचे निधन झाले होते. श्री. वाघ यांनी उभयतांच्या स्मरणार्थ वृध्दसेवा निधीसाठी प्रत्येकी एक लाख एक रुपयांची, म्हणजे एकूण दोन लाख रुपयांची देणगी दिली आहे, या पूर्वी २०२० मध्ये कु. शकुंतला यांचे निधन झाले होते तेव्हा श्री. वाघ यांनी चार लाख रुपयांची देणगी दिली होती. यांतील एक लाख रुपये संघासाठी, एक लाख रुपये वृद्धसेवा निधीसाठी व उर्वरीत एक लाख रुपये वैद्यकीय सेवा निधीसाठी, आणि एक लाख रुपये एज्युकेशन सोसायटीसाठी होते.

## ४. डॉ सुहास पांडुरंग वाघ यांजकडून एज्युकेशन सोसायटीसाठी आणखी एक लाख रुपये देणगी

गेल्या पिढीत माहीम येथे राहणारे श्री पांडुरंग विनायक वाघ हे नरहरी वाघ म्हणून सर्वांना परिचित होते. मुखपत्रिकेचे वडील भावंड म्हणजे संघातर्फे ७५ वर्षापूर्वी प्रकाशित होणारे 'शारदा' या त्रैमासिकाच्या संपादक मंडळावर ते १९३८-४० च्या दरम्यान कार्यरत होते व ते कोकणी विभाग सांभाळत. नरहरी काकांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांचे पुत्र इ. एन.टी. तज्ज्ञ डॉ. सुहास वाघ यांनी आपल्या एज्यु. सोसायटीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली होती. नरहरी काकांच्या पत्नी श्रीमती सुंदर यांच्या जन्मप्रसंगी सुद्धा डॉ.वाघ यांनी वृद्धसेवा निधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली होती.अलीकडेच डॉ. सुहास वाघ यांनी आईवडिलांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला आणखी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | दि एन्‌केजीएसबी कोऑप. बँकेकडून | १०,००० |
| २. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या १६ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अजीत यांजकडून | ४,००२ |
| ३. | श्रीमती सुधा विश्वंभर कसबेकर यांच्या स्मरणार्थ पुत्र देवीदास यांजकडून | १०,००० |
| ४. | श्रीमती रमाबाई त्रिंबक कसबेकर यांच्या स्मरणार्थ नातू श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून | १०,००० |
| ५. | श्रीमती रमाबाई व श्री. विश्वनाथ यशवंत तेलंग यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती संगीता शिरीष वाघ यांजकडून | ५,००,००० |
| ६. | श्रीमती सविता व श्री. किशोर वासुदेव सबनीस यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. मोहन व कन्या श्रीमती निशा केदार पालेकर यांजकडून | ५,००,००० |
| ७. | श्री. जिवबा नागेश सरदेसाई यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती आशा यांजकडून | २५,००० |
| ८. | श्रीमती शांता व श्री. वासुदेव जनार्दन कामत यांच्या स्मरणार्थ कामत कुटुंबीयांकडून | २५,००० |



## वृद्ध सेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती वृंदा व श्री. गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ भाचे सर्वश्री आनंद व दिलीप गणपत आरस यांच्याकडून | १०,००० |
| २. | श्रीमती अंजली अविनाश वाघ यांच्या स्मरणार्थ पती श्री. अविनाश मधुकर वाघ यांजकडून | १,००,००१ |
| ३. | श्रीमती शकुंतला मधुकर वाघ यांच्या स्मरणार्थ बंधु श्री. अविनाश मधुकर वाघ यांजकडून | १,००,००१ |
| ४. | श्री दत्तात्रय मंगेश मुझुमदार यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती प्रिया यांजकडून | २५,००० |
| ५. | श्री. श्रीकांत बळवंत बोरकर यांच्या स्मरणार्थ बहिण श्रीमती नंदिनी अनील घोटींग व कुटुंबीयांकडून | ५,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | दि एन्‌केजीएसबी कोऑप. बँकेकडून | १०,००० |
| २. | श्रीमती सुंदर व श्री. पांडुरंग विनायक वाघ यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. सुहास यांजकडून | १,००,००० |
| ३. | डॉ. विनायक बाबूराव नाडकर्णी (बाबन) यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. मोरेश्वर यांजकडून | ५,००० |

***

A name that spells its class !

**WINOVER CATERERS**

**Marriages, Thread Ceremonies, Engagement and Birthday Parties Etc.**

**WE DELIVER FOOD / SNACKS FOR PARTIES AT HOME**

**Take away and TIFFINS Or opt for Ala-carte Amchi food and Variety cuisines**

ALL OVER MUMBAI-THANE-VIRAR

**Call or Whatsapp for our take away menu**

**Vinod Kaval / Ashwini / Rupali**

**98208 43392 / 90048 41198 / 98923 00608**

Shop No. 4, Andrea Apartment off Azad Road, Vile Parle East, Mumbai - 400 057

## ।। कालाय तस्मै: नम: ।।

| | नाव | गाव | सध्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १) | श्री. विजयानंद वसंतराव भद्री | हल्याळ | अंधेरी (पूर्व) |
| २) | श्री. सुरेशचंद्र रामराव बोरकर | कडवाड | परळ |
| ३) | श्री. मधुकर घनश्याम गायतोंडे | अस्नोटी | पुणे |
| ४) | श्रीमती नलीनी शंकर कसबेकर | कडवाड | दादर |
| ५) | श्री. सुभाष विष्णु कुलकर्णी | किन्नर | कारवार |
| ६) | श्री. मंगेश शांताराम कुलकर्णी | कणसगिरी | कणसगिरी |
| ७) | डॉ. चित्रा अरुण मुजुमदार | अंकोला | पारले |
| ८) | श्रीमती मंगला सदानंद नाडकर्णी (पूर्वाश्रमीची अनुसुया वागळे-बाड) | मल्लापूर | दहीसर(पूर्व) |
| ९) | श्रीमती वृंदा विजय(राजाभाऊ) नाडकर्णी | अगळी | माहीम |
| १०) | श्रीमती रुक्मिणी माधव नाडकर्णी | अंकोला | दादर |
| ११) | श्रीमती लता रवी नायर (पूर्वाश्रमीची लता विनायक देसाई) | हन्नेहळ्ळी | ठाणे |
| १२) | श्रीमती मंगला (साई) सत्‌चित वाघ | सदाशिवगड | पारले |
| १३) | श्रीमती मंगला दिगंबर वागळे | माजाळी | पुणे |
| १४) | श्री. राजीव रामदास फेणे | चेंडिये | बेंगलूर |
| १५) | श्री. मोहन शांताराम वागळे | अस्नोटी | अंधेरी |
| १६) | श्री. हर्षद शांताराम सबनीस | कारवार | चेंबूर |

अरुण भास्कर कसबेकर यांच्या " **कवडसे मनाचे** " ह्या पुस्तकाला वाचकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. तरी अजून ज्यांना हे पुस्तक विकत घ्यावयाचे असेल त्यांनी NKGSB SANGH च्या Office मध्ये संपर्क साधावा.

ऑफीस फोन नंबर मुखपत्रिकेच्या कव्हर पेजवर दिला आहे.

धन्यवाद.



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक प्र. मो. कसबेकर यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.